प्रचंड खपाचे एकमेव निःपक्ष व निर्भीड दैनिक
स्थापना १९३९
पुढारी
www.pudhari.com

# 'यशोदा'च्या विद्यार्थ्यांची क्विक हिल सायबर शिक्षा व सुरक्षा अभियानात निवड

**सातारा : पुढारी वृत्तसेवा**



यशोदा टेक्निकल कॅम्पस मधील संगणक शास्त्र विभागातील चार विद्यार्थ्यांची क्विक हिल फाऊंडेशनच्यावतीने राबवण्यात आलेल्या सायबर शिक्षा फॉर सायबर सुरक्षा या अभियानासाठी किरण सानप, सत्याजीत जगताप, गणेश राणे, अनिकेत शिर्के या चार विद्यार्थ्यांची निवड झाली आहे.

या विद्यार्थ्यांचे ट्रेनिंग व ओरिएंटेशन विमान नगर (पुणे) येथील क्विक हिल कंपनीच्या ऑफिसमध्ये नुकतेच पार पडले. या ट्रेनिंग सेशन दरम्यान विद्यार्थ्यांना प्रोग्राम समन्वयक अजय शिर्के, सुगंधा दाणी, गायत्री पवार यांनी मार्गदर्शन केले. क्विक हिलच्या चेअर पर्सन अनुपमा काटकर यांनी विद्यार्थ्यांना पुढील वाटचालीस शुभेच्छा दिल्या. निवड झालेले विद्यार्थी पुढील काही दिवसांसाठी क्विक हिल फाऊंडेशनच्या सायबर सिक्युरिटीच्या जनजागृती बद्दल विद्यार्थ्यांना व सामाजिक घटकांना मार्गदर्शन करणार आहेत. तसेच प्रा. विकास चव्हाण यांची या अभियानासाठी शिक्षक समन्वयक म्हणून निवड झाली आहे.

प्राचार्य डॉ. प्रवीणकुमार बडदापुरे म्हणाले, निवड झालेले विद्यार्थी हे आपल्या शैक्षणिक संकुलाच्या सामाजिक जबाबदाऱ्या पार पाडण्याचे काम करणार आहेत. तसेच हे अभियान सक्षमपणे राबवण्यासाठी त्यांनी विद्यार्थ्यांना मार्गदर्शन केले. निवड झालेल्या विद्यार्थ्यांचे यशोदा शिक्षण संस्थेचे संस्थापक अध्यक्ष प्रा. दशरथ सगरे, उपाध्यक्ष प्रा. अजिंक्य सगरे, डायरेक्टर डॉ वि. के. रेदासनी, असोसिएट डायरेक्टर प्रा. आर. डी. मोहिते, रजिस्ट्रार गणेश सूरवसे, संगणक विभागाच्या विभाग प्रमुख डॉ. सरिता बलशेटवर यांनी अभिनंदन केले.

My Satara Edition
Jul 2, 2024 Page No. 02